**<u>रे.दि.मु.नं.२९३/२०२५</u>**

**<u>जगदीश विठ्ठल पाटील वगैरे १ वि. महाराष्ट्र शासन वगैरे ५</u>**

वादीतर्फे विद्वान वकील श्री.आर.डी. कदम

प्रतिवादी क्र.१ / सरकार पक्षातर्फे तर्फे विद्वान वकील श्री.एम.व्ही. कुलकर्णी

प्रतिवादी क्र.२ ते ६ तर्फे विद्वान वकील श्री.ए.बी. देवकर

## <u>नि.५ खालील आदेश</u>

०१. वादींनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.०६ विरुध्द तुर्तातूर्त मनाई आदेशासाठी दाखल केला आहे. वादींचे अर्जात असे कथन आहे की, दावा कलम १अ आणि १ब मध्ये वर्णित आणि उल्लेखित मिळकती या दाव्याचा विषय असून त्यास यापुढे संक्षेपाकरिता "दावा मिळकती" असे संबोधण्यात येत आहे.

<u>वादींचे थोडक्यात हकिकत अशी आहे की</u>,

०२. वादींचे पुढे असे कथन आहे की, दावा कलम १अ मध्ये नमूद असलेल्या मिळकतीत वादींचे पूर्वहक्कदार व त्यांचे मृत्यु पश्चात स्वत: वादी हे ऊस, वगैरे बागायती पिके स्वत:चे विहीरीवरील व इरिगेशनच्या पाण्यावर घेत होते व आहेत याची संपूर्ण कल्पना प्रतिवादींना आहे. वादींना त्यांच्या उपजिवीकेसाठी दावा मिळकतीशिवाय अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. प्रतिवादींनी बेकायदेशीरपणे दावा मिळकत १अ व १ब मधील भागात घुसखोरी करून ऊस पिकाची व क्षेत्राचे नुकसान करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

०३. दावा कलम १अ आणि १ब या मिळकतीच्या पूर्व हद्दीवर रस्त्याच्या कडेला ०६ चेंबर दावा शेत जमिनीला पाणी देणेसाठी वादींनी उभारले आहेत. ते सर्व चेंबर सध्या चालू स्थितीत आहेत. प्रतिवादी हे वादींच्या हद्दीत म्हणजेच दावा मिळकतीमध्ये बेकायदेशीरपणे घुसखोरी करून नवीन रस्त्याचे दावा मिळकतीमधील पूर्वेकडील पूर्वेकडील भाग ताब्यात घेणार असल्याची भाषा प्रतिवादी क्र.०६ हे वारंवार वादींना बोलावून दाखवत आहेत. तसे झाल्यास वादीचे चेंबर व बाजूला असणाऱ्या झाडांचे व ऊस पिकाचे मोठे नुकसान होणार आहे.

०४. दावा मिळकतीच्या पूर्व बाजूस १० मीटर रस्ता पूर्वीपासून अस्तित्वात असून प्रतिवादी यांनी वादींचे नुकसान करण्याच्या हेतूने मिळकतीची कसलीही मोजणी न करता दावा मिळकतीच्या पूर्व बाजूकडून शेत जमिनीचे क्षेत्र रस्त्यामध्ये सामील करणेचे दुष्ट हेतूने कशाही प्रकारे दावा मिळकत संपादित न करता दावा कलम ०१ च्या अति उत्तरेकडील लागण ऊसाची व दावा कलम ०१ब मधील खोडावा ऊस पिकाची नुकसार करणार असल्याची भाषा प्रतिवादी क्र.०२ चे ठेकेदार म्हणजेच प्रतिवादी क्र.०६ चे कर्मचारी यांनी दि.१६/५/२०२५ रोजी वादींना बोलावून दाखवली. तसेच दावा मिळकतीच्या पूर्व बाजूकडील बांधावर असणारी १० मोठी झाडे तोडून दावा मिळकतीतील काही भाग रस्त्यात सामावून घेवून नवीन मोठा रस्ता करणार असलेची भाषा बोलून दाखवली. तसे झाल्यास वादीचे पैशात न भरून येणारे नुकसान होणार आहे. सबब वादींनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.०६ विरूध्द तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळावा म्हणून दाखल केला आहे.

०५. वादींनी त्यांच्या अर्जाच्या समर्थनार्थ नि.३८ येथे त्यांचे प्रति म्हणणे वादीतर्फे साक्षीदार युवराज प्रभाकर माळी यांचे शपथपत्र दाखल केले आहे. तसेच वादींनी त्यांच्या अर्जाच्या समर्थनार्थ खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

| अ.क्र. | कागदाचा तपशिल |
|---|---|
| ०१ | मौजे शेरे ता.कराड येथील गट नं.१०२/३क चा ७/१२ उतारा |
| ०२ | मौजे शेरे ता.कराड येथील गट नं.१०२/३ड चा ७/१२ उतारा |
| ०३ | मौजे शेरे ता.कराड येथील दावा मिळकतीचा उपअधिक्षक, भूमी अभिलेख कराड यांचेकडील सही शिक्याची नकाशाची झेरॉक्स |
| ०४ | दावा मिळकतीची वस्तुस्थिती दर्शविणारे ३ फोटो |
| ०५ | दावा मिळकतीमधील असलेल्या चेंबरचे फोटो |
| ०६ | दावा मिळकतीमधील असलेल्या झाडांचे फोटो |

०६. प्रतिवादी क्र.०१ ते ०६ यांनी नि.३१ येथे त्यांचे म्हणणे व कैफियत दाखल करून वादींच्या अर्जास तीव्र हरकत घेतली आहे. त्यांचा बचाव असा आहे की, वादींनी त्यांच्या अर्जात केलेली कथने शाबीत करण्याची संपूर्ण जबाबदारी वादींची आहे. वादींनी दावा मिळकतीमध्ये त्यांचा असणारा हिस्सा स्पष्टपणे नमूद केलेला नाही. तसेच वादींनी दावा मिळकतीत वादींची कब्जेवहिवाट असल्याचे अर्जात नमूद केलेले नाही. वादींनी दाखल केलेल्या व उल्लेख केलेल्या मालकी हक्काचे वर्णन हे वादींनी स्वत: दाखल केलेल्या कागदपत्रांशी मेळ लागत नाहीत. तसेच दावा मिळकतीच्या सातबारा उताऱ्यामध्ये नमूद असणाऱ्या सहहिस्सेदारांना वादींनी याकामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील केलेली नाही. वादींचा अर्ज केवळ या कारणावरून फेटाळणेस पात्र आहे. वादींनी अर्जात नमूद केलेले तथाकथित पाण्याचे चेंबर यांचे नेमके स्थान कुठे आहे याचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही. वादींच्या मालकीची कोणतीही झाडे रस्त्यालगत नाहीत. वादींनी प्रस्तुतचा दावा व अर्ज अत्यंत सहज व निष्काळजीपणे, आवश्यक पूर्ण माहिती न घेता दाखल केल्याचे स्पष्ट आहे होत आहे. ज्या रस्त्याच्या संदर्भाने वादी ताकीद मागत आहे त्याचा योग्य तपशिल वादींनी

अर्जामध्ये नमूद केलेला नाही. वादींनी प्रस्तुत दावा दाखल करून 'विनीर्दिष्ट अनुतोष कायदा कलम २०अ(१) अंतर्गत येत असल्याचे जाणीवपूर्वक नमूद केलेले नाही. त्यामुळे या कारणावरून देखील वादीचा दावा फेटाळणेस पात्र आहे. प्रतिवादींनी त्यांचे बचावाचे समर्थनाथ कोणतेही कागद दाखल केलेले नाहीत.

०७. प्रतिवादी क्र.०२ ते ०५ हे एम.आय.डी.सी. या महाराष्ट्र शासनाच्या महामंडाळासाठी काम करत आहेत व आपली कर्तव्ये निर्देश केलेप्रमाणे निभावत असतात. प्रतिवादी क्र.०६ हे पायाभूत सुविधा निर्माण करणारी एक नामांकित कंपनी आहे. यातील नमूद प्रतिवादी हे 'पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप मॉडेल' नुसार राज्य महामार्ग क्रमांक १४८ ची लांबी १०१ कि.मी. चे काही प्रमाणात सुधारणा करण्याचे काम सध्या करत आहेत. सदरची सुधारणा ही शासनाच्या तिजोरीमधून होत असून सदर रस्त्याचा वापर हा हजारो लोकांचेकडून होत आहे. सदर रस्ता सुधारण्याचे काम बंद पडावे, सरकारी तिजोरीचे नुकसान व्हावे व सुधारणेचे काम प्रलंबित राहून लोकांची गैरसोय व्हावी या दुष्ट हेतूने अर्ज व दावा दाखल केला आहे. वादातीत रस्ता सुधारणेचे काम हे दि.९/१०/२०२४ रोजी पासुन अधिकृतरित्या चालू असून ते ३० महिन्यात पूर्ण करणे प्रतिवादींवर बंधनकारक आहे. त्याकरिता प्रतिवादी हे अनेक यंत्रे व मनुष्यबळ व पैसा खर्च करत आहे. त्यामध्ये व्यत्यय आल्यास प्रतिवादींचे त्याचबरोबर सर्वसामान्य जनतेचे देखील नुकसान होणार आहे. प्रतिवादी करत असलेल्या रस्ता सुधारणेमुळे दावा मिळकतीत असलेल्या ऊस पिकांचे कोणतेही नुकसानर होत नाही. तथाकथित दावा मिळकती शेजारी असणारे नैसर्गिक नाले/गटार ओलांडून कोणतेही सुधारणा काम होणार नाही. त्यामुळे वादींच्या पाण्याचे चेंबर अगर शेतातील पिकाचे कसलेही नुकसान होणार नाही. दावा मिळकतीशेजारी असणारी मोठी झाडे ही सरकार मालकीची होती व आहेत. त्याच्या मालकिशी वादींचा कसलाही संबंध नाही. त्याबाबत रस्ता सुधारणा करतेवेळी

कायदेशीर प्रक्रियेला अनुसरून परवानगी ही प्राधिकृत सरकारी अधिकारी व प्रतिवादी यांच्यामधील विषय असल्याने ती झाडे दाव्याचा विषय होत नाहीत. त्यामुळे वादी हे त्याबाबत कोणताही आदेश न्यायालयाकडे मागू शकत नाहीत. वादातीत नमूद रस्ता सुधारणा ही पायाभूत सुविधा (infrastructure project) या श्रेणीतील काम असल्याने त्याचे अंमलबजावणीस दिरंगाई होईल असा कोणताही आदेश वादीस मागता येणार नाही अथवा न्यायालयास तो मंजूर करता येणार नाही. वादातीत रस्त्याच्या सुधारणेसाठी शासनाच्या तिजोरीतून मोठ्या प्रमाणावर रक्कम खर्च होत आहे. सदर रस्त्याची सुधारणा वेळेत पूर्ण न झाल्यास असंख्य लोकांचे जीवन सुकर होणार आहे. तसेच विनीर्दिष्ट अनुतोष कायदा कलम २०अ(१) च्या विरुध्द प्रस्तुतचा दावा असल्यामुळे वादीच्या बाजूने प्रथमदर्शनी केस नाही. वादातीत रस्त्याची सुधारणा झाल्यास वादीचे पैशात न भरून येणारे नुकसान होत नाही, तसेच वादी हा न्यायालयात स्वच्छ हाताने न आल्यामुळे न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजूने नाही. या सर्व तथ्यांचा विचार करून वादीचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती प्रतिवादी क्र.०१ ते ०६ यांनी केली आहे.

०८. प्रतिवादी क्र.१ महाराष्ट्र शासन यांनी नि.४५ येथे त्यांची कैफियत दाखल करून वादींच्या अर्जास तीव्र हरकत घेतली आहे. प्रतिवादी क्र.१ यांची कैफियत व त्यात उपस्थित केलेल्या हरकती या जवळपास प्रतिवादी क्र.२ ते ६ यांनी त्यांच्या कैफियतीत उपस्थित केलेल्या मुद्द्याप्रमाणेच आहेत. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादातीत रस्ता हा राज्य महामार्ग क्र.१४८ असल्याचे वादीने जाणीवपूर्वक त्यांच्या अर्जात व दाव्यात नमूद केलेले नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी हे कोणत्याही प्रकारचा नवीन रस्ता, ते ही वाढीव, बांधत नाहीत तर पूर्वापार पासून अस्तित्वात असलेल्या रस्त्याची तेवढ्याच रूंदीमध्ये डागडुजी करत आहेत. सबब वादींचा अर्ज नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

०९. वादींचा अर्ज, अर्जासोबत दाखल केलेली कागदपत्रे, उभय पक्षांनी दाखल केलेले फोटोग्राफ्स तसेच प्रतिवादींनी दाखल केलेले म्हणणे वाचले. उभय पक्षांनी उपस्थित केलेले मुद्दे विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज निर्णीत करणेकरिता माझे समक्ष खालील वाद प्रश्न उपस्थित होत आहेत. त्याचे सकारण स्पष्टीकरण मी खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **वाद मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१** | वादीस सकृतदर्शनी खटला आहे का? | **नाही** |
| **२** | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे का? | **नाही** |
| **३** | मागणी केलेप्रमाणे मनाई न दिलेस वादीचे पैशात न भरून येणारे नुकसान होणार आहे का? | **नाही** |
| **४** | काय आदेश? | **अर्ज नामंजूर करणेत आला** |

## कारणमिंमासा

### वादप्रश्न क्र.१ ते ३ करिता –

१०. सदरील वाद प्रश्न हे परस्परात गुंतले असल्यामुळे तथ्यांची पुनरावृत्ती टाळणेकरिता तसेच विस्तार भयास्तव एकत्रित विचारात घेतले आहेत. वादींचे असे कथन आहे की, दावा मिळकत त्यांची मालकीची तसेच त्याच्या कब्जात असलेबाबत वाद नाही. तसेच प्रतिवादी हे दावा मिळकतीच्या बाजूने रस्ता करत आहेत याबाबत देखील दुमत नाही. दावा मिळकतीच्या लगत पूर्व बाजूस १० मिटर रूंदीचा रस्ता पूर्वापार पासून अस्तित्वात असून प्रतिवादींनी तो रस्ता वाढवून त्याचे बांधकाम केलेस वादीचे पाण्याचे चेंबर तसेच वादींच्या मालकीची झाडे तोडली जाणार आहेत. त्यामुळे

वादींचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. वादींच्या विद्वान वकिलांच्या कथनानुसार रस्त्यामुळे वादींच्या शेतातील एक सर जरी रस्त्यामध्ये बाधीत झाली तरी त्यांचे किमान १४ गुंठे क्षेत्राचे नुकसान होणार आहे. त्यामुळे देखील वादींचे पैशाचे स्वरूपात न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. वादींचे म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे वतीने प्रतिवादी क्र.६ हे वादातीत रस्ता रूंदीकरणाचे काम करताना दावा मिळकती घुसण्याचा प्रयत्न करत आहेत. प्रतिवादी क्र.६ यांनी वादींना ते रस्ता रूंदीकरण करणारच, भले वादींच्या मिळकतीचे नुकसान झाले तरी चालेल असे वादींना धमकावत आहेत. सबब वादींनी प्रतिवादी क्र.६ विरुध्द प्रस्तुतचा अर्ज दाखल करून त्यांचे विरुध्द तात्पुरती मनाई मागितली आहे.

११. प्रतिवादी क्र.२ ते ६ तर्फे विद्वान वकील श्री.ए.बी. देवकर यांनी असा युक्तिवाद केला आहे की दावा मिळकतीच्या कडेला १० मीटर रूंदीचा रस्ता पूर्वापार पासून अस्तित्वात आहे ही बाब त्यांना देखील मान्य आहे. परंतु दावा मिळकत एकट्या वादींच्या मालकीची व कब्जात असल्याचे त्यांना मान्य नाही. सदरची बाब सबळ अशा पुराव्याने सिध्द करण्याची जबाबदारी वादींची असताना वादींनी तसे केलेले नाही. प्रतिवादी करत असलेले काम हे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट या प्रकारात मोडत असल्यामुळे विनिर्दीष्ट अनुतोषाचा सुधारित कायदा कलम २०अ(१) नुसार प्रतिवादी करत असलेल्या रस्ता सुधारणे विरुध्द 'ना मनाई मागता येते', 'ना न्यायालयास तशी मनाई मंजूर करता येते’. वादातीत रस्ता हा राज्य महामार्ग क्र.१४८ असून शासनाने मंजूर केलेल्या नियमानुसार त्याची दुरूस्ती न झालेस सदरील रस्ता वापरणाऱ्या असंख्य प्रवाशांचे नुकसान तसेच त्यांची गैरसोय होणार आहे. याचा विचार करता एकट्या वादींच्या भलेपणाचा, ते ही वादीच्या बाजूने तसा सकृतदर्शनी खटला नसताना, हे असंख्य जनसामान्यांवर अन्याय करणारे होणार आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार ते कोणत्याही प्रकारचा नवीन रस्ता करत नसून

पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या रस्त्याची दुरूस्ती करत आहेत. दावा मिळकतीच्या बाजूला असणारी झाडे ही सरकारी मालकीची झाडे असून वादी हे सदरील झाडे त्यांच्या मालकीची असल्याबाबत कथन करून न्यायालयाची दिशाभूल करत आहेत. वाद मिळकतीचा सातबारा उतारा पाहिला असता सदरील झाडे वादीच्या मालकीची असलेबाबत त्यावर कसलाही उल्लेख नाही. यावरूनच वादींची कथने दिशाभूल करणारी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. वाद मिळकतीचा सातबारा उतारा पाहिला असता असे दिसून येते की, दावा मिळकत गट क्र.१०२/३क ही एकट्या वादींच्या मालकीची नसून त्यामध्ये वादींच्या बरोबरच अन्य सहहिस्सेदारांची नावे नमूद आहेत. कबूल तथ्यानुसार वादींनी अन्य सहहिस्सेदारांना पक्षकार केलेले नाही की जे कायद्यास अपेक्षित नाही. तसेच तिन्ही वादींच्या नावे एकूण ७७ आर क्षेत्र एकत्रितपणे नोंद आहे. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, सदर मिळकतीचे वाटप झालेले नसून तिन्ही वादी सदर मिळकतीचे एकत्रित मालक आहेत. असे असताना वादातीत रस्त्याच्या बाजूला असणारे क्षेत्र नेमके कोणत्या वादींच्या ताब्यात आहे अथवा कोणत्या सहहिस्सेदाराच्या ताब्यात आहे तथा सातबारा उताऱ्यावर नावे नमूद नसणाऱ्या अन्य सहहिस्सेदाराच्या ताब्यात आहेत याबद्दल संभ्रम निर्माण होतो. तसेच वादी मालकी सांगत असलेली झाडे त्यांच्या मालकीची असलेबाबत दावा मिळकतीच्या सातबारा उताऱ्यावर कसलीच नोंद असलेचे दिसून येत नाही. प्रतिवादी करत असलेले रस्ता सुधारणेचे काम हे सार्वजनिक हिताचे काम आहे याबाबत दुमत नाही. तसेच सदरची रस्ता दुरूस्ती ही इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट असल्याने विनिर्दीष्ट अनुतोषाचा कायदा कलम २०अ(१) नुसार वादीच्या दाव्यास व प्रस्तुत अर्जास कायद्याची स्पष्ट हरकत आहे ही बाब कायद्यानुसार निर्विवाद आहे. कबूल तथ्यानुसार प्रतिवादी यांनी शपथपत्रपूर्वक ते वादींच्या मिळकतीचे कसल्याही प्रकारचे नुकसान रस्ता दुरूस्ती करताना करणार नाहीत असे ठामपणाने कथन केले आहे. प्रतिवादी क्र.१ म्हणजेच महाराष्ट्र शासन यांनी दाखल केलेले फोटोग्राफ्स पाहिले असता असे

स्पष्ट दिसून येते की, वादातीत रस्ता हा वाद शेत मिळकतीपेक्षा ४ ते ५ फूट उंचावर आहे. सबब प्रतिवादींनी रस्ता तयार करताना / दुरूस्त करताना वादीच्या मिळकतीत जाणे शक्य नाही असे स्पष्टपणे दिसून येते. तसेच वादातीत रस्त्याच्या बाजूस साईड पट्टी असून त्या साईड पट्टीवरती रस्ता दुरूस्तीकरिता लागणारा मुरूम टाकलेला आहे व त्याच्या बाजूला सरकारी झाडे आहेत. या फोटोवरून असे दिसून येते की, वादातीत रस्ता खराब झालेला असून त्याची डागडूजी करणे आवश्यक आहे. या सर्व तथ्यांचा विचार करता माझे मतानुसार वादींना सकृतदर्शनी खटला नाही, न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने नाही तसेच मागितलेप्रमाणे वादींना मनाई न दिलेस वादींचे पैशात न भरून येणारे नुकसान होत नाही असे माझे स्पष्ट मत आहे. सबब, मी वर नमूद वाद प्रश्न क्र.१ ते ३ तद्अनुषंगाने उत्तरी करून वाद प्रश्न क्र.४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १} | नि.५ वरील अर्ज नामंजूर करणेत येतो. |
| २} | अर्जाचा खर्च दाव्याचे खर्चात सामाविष्ट करणेत येईल. |

KIRAN RAJARAM KHONDRE

Digitally signed by KIRAN RAJARAM KHONDRE
Date: 2025.06.19 17:17:11 +0530

कराड (किरण खोंद्रे)

दि.१९/०६/२०२५ ३रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कराड